गडचिरोली जिल्ह्यातील अतिदुर्गम भागात मिनी सेतू केंद्रे (आपले सरकार सेवा केंद्रे) स्थापन करणेबाबत.

महाराष्ट्र शासन
इलेक्ट्रॉनिक्स, माहिती तंत्रज्ञान व कृत्रिम बुद्धिमत्ता विभाग
शासन निर्णय क्रमांक: मिसेकें-२०२६/प्र.क्र.८०/TECH-१ (E-1730492)
हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा रोड,
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.
दिनांक: १६ जुलै, २०२६

संदर्भ : १. सामान्य प्रशासन विभाग (माहिती तंत्रज्ञान) शासन निर्णय क्र.मातंसं-१७१६/प्र.क्र.५१७/३९, दि.०५.१२.२०१६.
२. सामान्य प्रशासन विभाग (माहिती तंत्रज्ञान) शासन निर्णय क्र. मातंसं-१७१६/प्र.क्र.५१७/३९,दि. १९.०१.२०१८
३. जिल्हाधिकारी, गडचिरोली यांचे पत्र क्र. कार्या-७/म.स.सेतू/कावि/११६७/२०२६, दिनांक १६.०६.२०२६.

प्रस्तावना :

गडचिरोली जिल्ह्यातील बहुतांश गावे भौगोलिकदृष्ट्या अत्यंत दुर्गम, डोंगराळ आणि जंगलव्याप्त भागामध्ये येतात तसेच बराच भाग हा पूर्वी नक्षलप्रभावित असलेल्या क्षेत्रात येत असल्याने तेथील सामान्य नागरिक, विशेषतः आदिवासी, आर्थिकदृष्टया दुर्बल व वंचित घटकांपर्यंत शासनाच्या कल्याणकारी योजनांचा लाभ पोहचण्यास अडचण निर्माण होते. जिल्ह्यातील नागरिकांना साधे दाखले किंवा ऑनलाईन अर्ज करण्यासाठी अनेक किलोमीटर अंतराची पायपीट करुन तालुका अथवा जिल्हा मुख्यालयाच्या ठिकाणी जावे लागते. त्यामुळे नागरिकांचा वेळ, पैसे व श्रम मोठ्या प्रमाणात खर्ची पडतात.

सदर बाब लक्षात घेऊन सद्यस्थितीत जिल्ह्यात कार्यरत असलेल्या १३ दादालोरा खिडकी केंद्रे व ९ आदी सेवा केंद्रे अशा एकूण २२ केंद्रांमध्ये उपलब्ध पायाभूत सुविधांचा उपयोग करून मिनी सेतू केंद्रे (आपले सरकार सेवा केंद्रे) सुरू केल्यास नागरिकांना गावपातळीवरच विविध ऑनलाईन सेवा उपलब्ध होतील, दुर्गम भागातील नागरिकांना तालुका अथवा जिल्हा मुख्यालयी हेलपाटे मारावे लागणार नाही, त्यामुळे त्यांचा वेळ, पैसा आणि अकारण श्रम वाचतील, शासनाच्या योजनांचा लाभ सुलभ होईल, डिजिटल समावेशनास चालना मिळेल तसेच शासनाच्या सेवा वितरण व्यवस्थेची परिणामकारकता वाढेल. या सर्व बाबी विचारात घेऊन गडचिरोली जिल्ह्यातील अतिदुर्गम भागात मिनी सेतू केंद्रे (आपले सरकार सेवा केंद्रे) स्थापन करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय :

गडचिरोली जिल्ह्यातील अतिदुर्गम भागातील विद्यमान १३ दादालोरा खिडकी केंद्रे व ९ आदी सेवा केंद्रे अशा एकूण २२ केंद्रांमध्ये विशेष बाब म्हणून मिनी सेतू केंद्रे (आपले सरकार सेवा केंद्रे) स्थापन करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

२. सदर केंद्रांच्या संचालनासाठी आवश्यक ऑपरेटरची निवड करण्याची कार्यवाही जिल्हाधिकारी यांनी त्यांच्या स्तरावर करावी.

३. सदर केंद्रावर **एकवेळ ची बाब** म्हणून आवश्यक साधनसामग्री (उदा. संगणक, प्रिंटर, स्कॅनर, फर्निचर इत्यादी) पुरविण्यात यावी. यासाठी निधी राज्य सेतू सोसायटीमार्फत जिल्हाधिकाऱ्यांना उपलब्ध करून देण्यात येईल. याबाबत जिल्हाधिकारी यांनी सविस्तर प्रस्ताव इलेक्ट्रॉनिक्स, माहिती तंत्रज्ञान व कृत्रिम बुद्धिमत्ता विभागाकडे सादर करावा.

४. सदर केंद्रे अतिशय दुर्गम व पूर्वी नक्षलप्रभावित असलेल्या क्षेत्रात येत असल्याने केंद्रांचे कार्यान्वयन नियमितपणे सुरू ठेवणे तसेच त्यांच्या कार्यप्रणालीमध्ये स्थैर्य (Operational Stability) निर्माण करणे अत्यावश्यक आहे. त्यानुषंगाने, अपवादात्मक बाब म्हणून निवड करण्यात आलेल्या केंद्रचालकांना केंद्रांच्या कार्यान्वयनासाठी सहाय्य म्हणून कमाल एक वर्षाच्या कालावधीसाठी प्रतिमाह रु. ८,०००/- (रुपये आठ हजार फक्त) इतके कार्यान्वयन सहाय्य (Operational Help) देण्यात येईल. तथापि, सदर कार्यान्वयन सहाय्य केवळ एक वर्षाच्या कालावधीपुरतेच देय राहील. त्यानंतर संबंधित केंद्रचालकांनी सदर केंद्रे स्वबळावर चालवणे आवश्यक राहील.

५. जिल्हाधिकाऱ्यानी एका वर्षासाठी होणाऱ्या आवर्ती खर्चासाठी निधीची तरतूद जिल्हास्तरावर करण्यात यावी.

६. सदर २२ मिनी सेतू केंद्रांच्या स्थापनेसंदर्भातील सर्व आवश्यक कार्यवाही जिल्हाधिकारी गडचिरोली, आयुक्त इलेक्ट्रॉनिक्स माहिती तंत्रज्ञान व कृत्रिम बुद्धिमत्ता आयुक्तालय व व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र माहिती तंत्रज्ञान महामंडळ यांनी परस्पर समन्वयाने करावी.

७. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक क्र. २०२६०७१६१३००२७७९११ असा आहे. हा शासन निर्णय डिजीटल स्वाक्षरीने स्वाक्षांकित करून निर्गमित करण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Digitally signed by YOGESH MAHADEO GOSAVI
Date: 2026.07.16 13:01:31 +05'30'

(योगेश गोसावी)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत:

१) मा. राज्यपालांचे सचिव, राजभवन, मलबार हिल, मुंबई

२) मा. मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई
३) मा. महाराष्ट्र विधान परिषद सभापती यांचे खाजगी सचिव, विधान भवन, मुंबई
४) मा. महाराष्ट्र विधान सभा अध्यक्ष यांचे खाजगी सचिव, विधान भवन, मुंबई
५) मा. उप मुख्यमंत्री (नगर विकास व गृहनिर्माण) यांचे सचिव, मंत्रालय, मुंबई
६) मा. उप मुख्यमंत्री (राज्य उत्पादन शुल्क, क्रीडा व युवक कल्याण, अल्पसंख्याक विकास व औकाफ) यांचे सचिव, मंत्रालय, मुंबई
७) सर्व मा. मंत्री/मा. राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
८) मा. विरोधी पक्ष नेता, विधान परिषद, विधान भवन, मुंबई
९) मा. विरोधी पक्ष नेता, विधान सभा, विधान भवन, मुंबई
१०) मा. मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई
११) शासनाचे सर्व मा. अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव,
१२) मा. प्रधान सचिव, महाराष्ट्र विधान मंडळ सचिवालय,
१३) महालेखापाल १/२ लेखा व अनुज्ञेयता, महाराष्ट्र, मुंबई/नागपूर,
१४) महालेखापाल १/२ लेखा व परीक्षा, महाराष्ट्र, मुंबई/नागपूर,
१५) पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई,
१६) विभागीय आयुक्त, नागपूर
१७) जिल्हाधिकारी, गडचिरोली
१८) मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, गडचिरोली
१९) आयुक्त, इलेक्ट्रॉनिक्स माहिती तंत्रज्ञान कृत्रिम बुद्धिमत्ता आयुक्तालय, मुंबई
२०) व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र माहिती तंत्रज्ञान महामंडळ, मुंबई
२१) मुख्याधिकारी, गडचिरोली
२२) जिल्हा कोषागार अधिकारी, गडचिरोली, महाराष्ट्र राज्य
२३) अधिदान व लेखाधिकारी, मुंबई/नागपूर
२४) मंत्रालयीन विभागांच्या नियंत्रणाखालील सर्व विभाग प्रमुख व कार्यालय प्रमुख,
२५) निवडनस्ती/TECH-१